2019-2020
C-III (1)

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

01.

# विद्यावार्ता®

Peer Reviewed International Refereed Research Journal

Issue-33, Vol-01 January to March 2020

Editor

Dr.Bapu G.Gholap

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

Jan. To March 2020
Issue-33, Vol-01

**Date of Publication
01 Jan. 2020**

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: Harshwardhan Publication Pvt.Ltd. Published by Ghodke Archana Rajendra & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor Dr. Gholap Bapu Ganpat.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

# Editorial Board & review Committee


- **Chief Editor**

Dr Gholap Bapu Ganpat
Parli_Vaijnath,Dist. Beed Pin-431515 (Maharashtra)
9850203295, 7588057695
vidyawarta@gmail.com

- **M.Saleem**

saien Ghulam street
Fatehgarh Sialkot city
Pakistan. Phone Nr. 0092 3007134022
saleem.1938@hotmail.com

- **Dr. Momin Mujtaba**

Faculty Member,Dept. of Business Admin.
Prince Salman Bin AbdulAziz University
Ministry of Higher Education,Kingdom of Saudi Arabia, Tel No.: +966-17862370 Extn: 1122

- **N.Nagendrakumar**

115/478, Campus road,
Konesapuri, Nilaveli ( Postal code-31010),
Trincomalee, Sri Lanka
nagendrakumarn@esn.ac.lk

- **Dr. Vikas Sudam Padalkar**

vikaspadalkar@gmail.com
Cell. +91 98908 13228 (India),
+ 81 90969 83228 (Japan)

- **Dr. Wankhede Umakant**

Navgan College, Parli –v Dist. Beed
Pin 431126 Maharashtra
Mobi.9421336952
umakantwankhede@rediffmail.com

- **Dr. Basantani Vinita**

B-2/8, Sukhwani Paradise,
Behind Hotel Ganesh, Pimpri,
Pune-17 Cell: 09405429484,

- **Dr. Bharat Upadhya**

Post.Warnanagar, Tq.Panhala,
Dist.Kolhapur-4316113
Mobi.7588266926

- **Jubraj Khamari**

AT/PO - Sarkanda, P.S./Block - Sohela
Via/Dist. - Bargarh, Pin - 768028 (Orissa)
Mob. No. – 09827983437
jubrajkhamari@gmail.com

- **Krupa Sophia Livingston**

289/55, Vasanthapuram,
ICMC, Chinna Thirupathy Post,
Salem- 636008 +919655554464
davidswbts@gmail.com

- **Dr. Wagh Anand**

Dept. Of Lifelong Learning and Extension
Dr B A M U Aurangabad pin 431004
Mobi. 9545778985
wagh.anand915@gmail.com

- **Dr. Ambhore Shankar**

Jalna,Maharashtra
shankar296@gmail.com
Mobi.9422215556

- **Dr. Ashish Kumar**

A-2/157, Sector-3, Rohini, Delhi -110085
*Ph.no:* 09811055359

- **Prof. Surwade Yogesh**

Dept. Of Library, Dr B A M U Aurangabad , Pin 431004
**Cell No:** +919860768499
yogeshps85@gmail.com

- **Dr.Deepak Vishwasrao Patil,**

At.Post.Saundhane, Near
Kalavishwa Computer, Tq.Dist.Dhule-424002.
Mobi. 9923811609
patildipak22583@gmail.com

- **Dr.Vidhya.M.Patwari**

Vanshree Nagar,Behind Hotel
Dawat, Mantha Road, Jalna-431203
Mobi.9422479302
patwarivm@rediffmail.com

- **Dr.Varma Anju**

Assistant Professor, Dept. of Education,
Sikkim University 6th Mile, Samdur Tadong-737102
GANGTOK - Sikkim, (M.8001605914)
anjuverma2009@rediffmail.com

- **Dr.Pramod Bhagwan Padwal**

Associate Professor,Department of Marathi
Banaras Hindu University,
Varanasi-221005.(Uttar Pradesh)
Mobi. 9450533466
pbpadwal@gmail.com

# Index

01) A study of Digital administration for new India
Dr. Gawande Sunil Laxman & Dr. Panchsheel Ekambekar, Nanded ||14

02) Advasi's wars against colonies
Prof. Dr. K. L. Giramkar, Kopargaon ||17

03) Success Stories of Women Entrepreneurship-Case Studies
Prof. S. B. Kamashetty & Prema S. Bandi, Vijayapur ||19

04) The role of yoga for Rehabilitation
Prof. Nikhil N. Ratnapure, Nagpur ||22

05) Impact of Self-help Group in Socio-economic development
Dr. Ramnath Baburao Sangule, Tirthpuri ||25

06) MAJOR PROBLEM OF FOOTWEAR INDUSTRY OF AGRA
Sushil Kumar Sengar & Dr Gaurav Kumar Gupta, Shikohabad ||28

07) DETAILS OF THE RESULTS OF THE REVOLT OF THE ZAMINDAR AND CHAIT SINGH ...
Dr. GOPAL KUMAR (ROSERA), Chapra ( Bihar) ||38

08) Cultural Conflicts: A Theoretical Perspective
Dr. Ganpatrao Baburao Patil, Kolhapur ||43

09) पर्यावरण आपत्ती व्यवस्थापन :- पुर (Environment Disaster Management ...
प्रा.डॉ. बबन बाबुराव बोबडे, बीड ||50

10) गडचिरोली जिल्ह्यातील इंदिरा आवास योजनेतील लाभार्थ्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा ...
कु. सुरेखा केशवराव हजारे, ता-जि. गडचिरोली ||52

11) डिजिटल व्यवहार प्रणालीचे सामाजिक परिणाम
प्रा. डॉ. नवनाथ एस. शिंदे, जालना ||56

12) शाळा-महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापनाची गरज - एक अभ्यास
प्रा. डॉ. दयानंद उजळंबे, जि. परभणी ||59

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

12

# शाळा-महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापनाची गरज - एक अभ्यास

प्रा. डॉ. दयानंद उजळंबे
उपप्राचार्य तथा भूगोल विभाग प्रमुख,
संत जनाबाई शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य, विज्ञान
महाविद्यालय गंगाखेड, जि. परभणी

**********

अ) प्रस्तावना :-

जगात आणि भारतामध्ये आपत्ती ही घटना नविन नाही. स्थानिक पातळी आणि राष्ट्रीय पातळीवरही आपत्ती होत असते. कुठलीही आपत्ती सांगून येत नाही आपत्तीचे साधरणत: दोन प्रकार आहेत निसर्गनिर्मित आपत्ती आणि मानवनिर्मीत आपत्ती . निसर्गनिर्मित आपत्ती मध्ये पूर, भूकंप , वादळे, त्सूनामी, अतिवृष्टी, हिमवादळे , हिमसख्खलन, याचा समावेश होतो तर मानवनिर्मीत आपत्तीमध्ये शहरीकरणामुळे, औद्यागिकरणामुळे निर्माण होणारी आपत्ती, वृक्षतोड प्लॅस्टीकचा वाढता वापर, अनाधिकृत बांधकाम, आग, अपघात, दहशतवादी हल्ले यांचा समावेश होतो . आपत्तीचा विळाखा पाहाता होणारी हानी खुप मोठी असल्यामुळे आपत्तीकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही हे लक्षात आल्यानंतर भारतीय प्रजातंत्राच्या ५६ व्या वर्षात संसदेने दि. २३ डिसेंबर २००५ रोजी भारताच्या राष्ट्रीपतीच्या अनुमतीने आपत्ती व्यवस्थापन कायदा सहमत करण्यात आला. त्यानुसार केंद्र सरकारने आणि राज्यसरकारने आपत्ती व्यवस्थापन विभाग सुरु करुन निसर्गनिर्मीत आणि मानवनिर्मीत आपत्तीचे व्यवस्थापन करण्यासाठी नियमावली तयार करण्यात आली त्यालाच आपत्ती व्यवस्थापन कायदा म्हणतात.

ब) बीज संज्ञा :- आपत्ती, मानवनिर्मीत, निसर्गनिर्मीत, त्सूनामी, आपत्ती व्यवस्थापन कायदा, आपत्ती व्यवस्थापनात शाळा - महाविद्यालयाची भूमिका

क) उद्देश :-

१) आपत्ती व्यवस्थापन कायद्याचा अभ्यास करणे.

२) आपत्तीचे प्रकार अभ्यासने

३) आपत्तीपुर्व व्यवस्थापनाचे नियोजन करणे.

४) आपत्ती झाल्यानंतर नियोजन करणे .

५) आपत्ती व्यवस्थापनात शाळा महाविद्यालयाची भूमिका काय असावी याचा अभ्यास करणे.

६) आपत्ती व्यवस्थापनासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी उपाय सांगणे .

ड) अभ्यास पद्धती आणि माहिती संकलन :-

प्रस्तूत शोधनिबंधामध्ये शाळा महाविद्यालयाची आपत्ती व्यवस्थापनात भूमिका या विषयी माहिती आणि विश्लेषण करणे आणि उपाय योजना सांगणे हा उद्देश असून वेगवेगळ्या अहवालातून विविध संकेत स्थळावरुन, महाराष्ट्र शासनाच्या आणि केंद्र शासनाच्या मदत आणि पुर्नवसन मंत्रालयामार्फत मिळालेल्या माहिती च्या आधारे माहिती संकलीत करुन त्याचे विश्लेषण करुन आपत्ती व्यवस्थापनात शाळा- महाविद्यालयाची भूमिका अभ्यासने आणि समस्या आणि उपाय योजना सांगणे हा आहे . प्रस्तूत माहिती ही थेरॉटीकल असल्यामुळे कोणत्याही प्रकारच्या सांख्याकीय माहिती प्रस्तूत शोध निबंधामध्ये घेतलेली नाही.

इ) विश्लेषण :-

आपत्ती म्हणजे अचानक उद्भवणारे संकट, उत्पात किंवा दुर्घटना जी कुठल्याही क्षेत्रात घडली असेल मग ती मानवनिर्मीत असो किंवा नैसर्गिक तसेच ज्या घटनेद्वारे मोठ्या प्रमाणात मनुष्य अथवा मालमत्तेचे किंवा दोन्ही प्रकारची हानी झालेली असेल व ज्या आपत्तीशी सामना करणे स्थानिक लोकांच्या अवाक्याबाहेर असेल.

आपत्ती व्यवस्थापन म्हणजे सुनियोजन, संघटनात्मक कृती व समन्वय या द्वारे अंमलबजावणी करण्याची उर्वरित आणि एकात्मिक अशी क्रिया जी खालील दृष्टीकोनातून व्यवहार्य ठरेल.

i) आपत्तीमुळे होणाऱ्या हानी व धोक्याला प्रतिबंध करणे.

ii) आपत्ती निवारण करणे किंवा धोक्याचे स्वरुप व व्याप्ती कमी करणे .

iii) धारण क्षमता बांधणी .

iv) आपत्तीचा सामना करण्याची पुर्वतयारी.

vi) आपत्ती झालेल्या हानीचा व तिच्या तिव्रतेचा अंदाज घेणे .

vi) सुटका व मदत कार्य

vii) पुनर्वसन आणि पुर्ननिर्माण .

उदा. आपत्ती व्यवस्थापनात पुराच्या बाबतीत अवलंबावे लागणारे व्यवस्थापन वेगळे, भूकंपाच्या बाबतीत अवलंबावे लागणारे व्यवस्थापन वेगळे तसेच दहशतवादाने निर्माण झालेल्या संकटामध्ये

अवलंबावे लागणारे व्यवस्थापन वेगळे असते.

आपत्ती व्यवस्थापनात महत्वाचा भाग मानवीय संवेदनाचा असतो . आपत्ती व्यवस्थापनात विशेषत्वाने आपत्तीनी बाधीत झालेल्या व्यक्तीसाठी सर्व यंत्रणानी केलेली एकत्रीत प्रयत्न असतो . आपत्ती व्यवस्थापनाचे तीन प्रमुख भाग करता येतील .

i) आपत्तीपुर्व व्यवस्थापन.

ii) आपत्कालीन व्यवस्थापन.

iii) आपत्तीनंतरचे व्यवस्थापन.

ई) शाळा - महाविद्यालयातील आपत्तीपुर्व व्यवस्थापन :-

जी शाळा महाविद्यालये ज्या भौगोलिक स्थानी निर्माण झालेली आहेत ते कोणत्या कटिबंधामध्ये येते, भूकंप प्रवन क्षेत्राच्या कोणत्या वर्गामध्ये येते प्राकृतिक रचना कशी आहे . यावरुन नियोजन करणे आवश्यक आहे .

आपत्तीपुर्व व्यवस्थापनात

१) परिसराचा आणि हवामानाचा अभ्यास करणे.

२) संभावीत आपत्ती येणाऱ्या घटनेची यादी करुन पूर्व नियोजन करणे .

३) आपत्ती व्यवस्थापन समिती स्थापन करणे .

४) आपत्ती पुर्व काळात विद्यार्थ्याला आणि शिक्षकांना कर्मचाऱ्यांना प्रशिक्षीत करणे .

५) आपत्ती व्यवस्थापनासंदर्भात शाळा महाविद्यालयात एन.एस.एस., एन.सी.सी. आणि आपत्ती व्यवस्थापन समिती मार्फत कार्यक्रम घेणे .

६) पोस्टर, पॉम्पलेट, भित्तीपत्रकाच्या साहाय्याने प्रभावी आपत्तीची माहिती शाळा महाविद्यालयाच्या परिसरात देण .

७) आपत्ती व्यवस्थापनासंदर्भात वेगवेगळ्या विभागाचे भ्रमणध्वनी आणि पत्ते संकलीत करणे उदा.आरोग्य सेवा, वाहतूक आणि दळणवळन, मदत आणि पुर्नवसन, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्ष .

८) आपत्ती संदर्भात विद्यार्थ्यासोबत बैठका, कार्यशाळा आणि प्रात्यक्षीक घ्यावे .

९) आपत्ती व्यवस्थापनाची उपकरणे संकलीत करणे व ते उपकरणे अद्यावत ठेवणे .

१०) आपत्ती व्यवस्थापनासाठी निधी संकलीत करणे (शासकिय, खाजगी)

११) यशदासारख्या संस्थेकडून आपत्ती व्यवस्थापना संदर्भात प्रशिक्षण देणे, आपत्ती व्यवस्थापनासाठी प्रशिक्षीत मनूष्यबळ निर्माण करणे .

१२) आपत्ती व्यवस्थापनासंदर्भात शाळाबाह्य स्वयसेवी संस्था आणि प्रशासनासोबत समन्वय ठेवावे .

१३) शाळा - महाविद्यालयात आपत्ती संदर्भात ज्या उपाययोजना करुन ठेवलेल्या आहेत त्याची इंतभूत माहिती सर्वापर्यंत पोहचविणे .

१४) एखादी आपत्ती येणार आहे हे गृहीत धरुन व्यवस्थापन समिती आणि विद्यार्थ्यांने रंगित तालिम घेणे .

१५) शाळेची इमारत, दिनचर्या, संभाव्य धोके, शाळेचा नकाश आपत्कालीन रस्ता आणि आपत्कालीन संपर्क क्रमांक या बद्दल विद्यार्थ्याला माहिती देणे. दर्शनीय ठिकाणी याबद्दलची माहिती (बोर्डावर) दिली जावी .

१६) कोणत्याही आपत्तीस तोंड देऊन शकतील अशी सक्षम बांधकामे करण्यासाठी निधीची तरतुद करावी दरवर्षी आपत्ती व्यवस्थापन निधीची ही तरतूर करावी.(स्थानिक पातळीपासून राष्ट्रीय पातळीपर्यंत)

१७) शाळा- महाविद्यालय दहशतवादी हल्यांना चोख प्रतिउत्तर देण्याठी त्या पध्दतीचे प्रशिक्षण एन.सी.सी. आणि एन.एस.एस. च्या विद्यार्थ्यांना देणे व या संदर्भात पोलिस सुरक्षादलाशी त्वरीत संपर्क साधावा .

उ ) शाळा-महाविद्यालयातील आपत्कालीन व्यवस्थापन :-

१) आपत्ती काळात जलद आणि प्रभावशाली प्रतिसाद कार्यान्वीत करण्यासाठी निरनिराळ्या यंत्रनेसोबत संपर्क साधणे आवश्यक आहे उदा. अग्नीशमन दल, जिल्हा प्रशासन, विभागीय आयूक्त, हवामान शास्त्र विभाग, राज्य आणि राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन केंद्राशी संपर्क साधावा.

२) आपत्ती काळात कुठल्याही प्रकारच्या अफवावर विश्वास न ठेवण्यासाच्या सूचना विद्यार्थ्यांना जबाबदार प्रशासनानी द्याव्यात.

३) आपत्तीच्या वेळी चेंगराचेंगरी आणि समकक्ष आपत्ती होणार नाही यासाठी यंत्रणा उभी करुन त्या पध्दतीने भोंग्याद्वारे विद्यार्थ्यांना सूचना द्याव्या.

४) शाळा- महाविद्यालयामध्ये आपत्कालीन परिस्थितीत आपत्कालीन रस्ता त्वरीत खुला करावा .

५) शाळा- महाविद्यालयातील आपतकालीन स्थीतीमध्ये त्वरीत वीज (करंट)बंद करावी, सर्व प्रथम लहान मूले आणि अपंग विद्यार्थी बाहेर कशी काढता येतील याचे नियोजन करावे. अशा परिस्थीत लिफ्टचा वापर टाळावा .

६) शाळेबाहेर मोठी आपत्ती आल्यास (उदा. पूर) त्या

संदर्भात विद्यार्थी सुरक्षीत घरी कसे पोहचतील याचे नियोजन करावे.

७) विद्यार्थी शाळेबाहेर काढताना शिस्तीने बाहेर कसे येतील या संदर्भात नियोजन करणे .

८) आपत्ती होताना सुरक्षीत इमारती बाहेर कसे येवू या संदर्भात नियोजन करावे.

९) आपत्तीच्या वेळी विद्यार्थ्याने प्रयोगशाळेतून त्वरीत बाहेर येण्यासाठी प्रयत्न करणे. प्रयोगशाळेतील ज्वलनशील पदार्था संदर्भात योग्य ती काळजी विद्यार्थ्यांनी घेतली पाहिजे .

ऊ) शाळा - महाविद्यालयातील आपत्तीनंतरचे व्यवस्थापन :-

आपत्ती येवून गेल्यानंतर आपत्ती नंतरचे व्यवस्थापनही महत्त्वाचे आहे .

१) आपत्तीनंतर सर्वप्रथम आपत्कालीन संपर्क क्रमांकाच्या सहाय्याने आपत्तीबद्दलची माहिती देणे .

२) रोडिओ, व इतर इलेक्ट्रॉनीक साधणाच्या सहाय्याने आपत्तीची स्थिती जाणून घ्यावी. कुठल्याही अफवावर विश्वास ठेवू नये, मदत आणि पुर्नवसन केंद्रानी ज्या सूचना दिलेल्या आहेत त्याचे पालन करावे. जखमी आणि अडकलेल्या विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांना बाहेर काढण्यासाठी त्वरीत काम युध्दपातळीवर हाती घेणे त्यासाठी एन.एस.एस. , आपत्ती व्यवस्थापन समिती, प्रशिक्षीत व्यक्तीने या प्रकारच्या कामाला त्वरीत सुरवात करणे .

३) जखमी आणि अडचणीत सापडलेल्या विद्यार्थ्यांला सर्वोत्परी मदत कशी मिळेल यासाठी नियोजन करणे .

४) आपत्ती झाल्यानंतर पुन्हा आपत्तीला सामोरे जाण्यासाठी दर महिन्याला माहिती देणे व तसा अहवाल जिल्हा आपत्ती व्यवस्थापनास सादर करणे .

५) आपत्ती व्यवस्थापनाचे शॉर्ट टर्म कोर्सेस सुरु करण्यासाठी शासनाकडून मान्यता घेवून प्रशिक्षीत संस्था आणि व्यक्तींच्या सहाय्याने विद्यार्थ्याला आपत्तीसंदर्भात माहिती देणे .

६) नंतरच्या आपत्तीसंदर्भात साधनसामुग्रीचे संकलन करणे . वेळोवेळी त्यात वाढ करणे .

७) भविष्यातील आपत्तीसंदर्भात येणाऱ्या अडचणी सांगणे त्या संदर्भात विविर्थ्यांना आपल्या परिसरात कोणत्या आपत्ती येवू शकतात याची पूर्वकल्पना देणे .

८) राज्य आणि केंद्र सरकारच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या ज्या सूचना आलेल्या आहेत त्यावेळी अंमलबजावणी करणे .

९) यशदासारख्या संस्थेमार्फत आपली - व्यवस्थापन प्रशिक्षण आणि आराखडा तयार करणे .

१०) भविष्यातील आपत्तीला तोंड देण्यासाठी राष्ट्रीय आणि राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाने ज्या सुचना दिलेल्या आहेत. त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शाळा-महाविद्यालयाच्या प्रमुखाने आणि विद्यार्थ्यांनी दक्ष राहून आपत्तीला तोंड देण्यासंदर्भात अद्यावत राहने गरजेचे आहे .

ए) निष्कर्ष :-

आपत्ती ही नैसर्गिक आणि मानवनिर्मीत घटना असून आपत्तीला सामोरे जाण्यासाठी आपत्तीपुर्व व्यवस्थापन आणि आपत्ती दरम्यान व्यवस्थापन आणि आपत्तीनंतरचे व्यवस्थापन शाळा - महाविद्यालयात योग्य ठेवण्यासाठी शाळेच्या प्रशासनाने, कर्मचाऱ्यांनी, आपत्ती व्यवस्थापन समितीने जागरुक राहणे गरजेचे असून, आपत्तीच्या वेळी सर्व केंद्राशी समन्वय राखून आपल्या शाळेत आणि महाविद्यालयात आपत्तीची तिव्रता कमी कशी करता येईल . यासाठी प्रयत्न करुन जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाच्या मार्गदर्शनाखाली शाळा - महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापन केंद्र तयार करुन राष्ट्रीय आपत्तीचे निराकरण करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे . त्यासाठी नियोजन, प्रशिक्षण, कृती करणे आवश्यक आहे . यशदा सारख्या संस्थेमार्फत आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण घेणे गरजे आहे . दहशतवाद हि सुध्दा राष्ट्रीय आपत्ती असून शाळा - महाविद्यालयामध्ये दहशतवाद प्रतिबंध केंद्रामार्फत आणि आपत्ती व्यवस्थापन समितीमार्फत विद्यार्थ्यांना योग्य ते प्रशिक्षण देण्याची गरज आहे . येणाऱ्या काळात प्रशासनाने आणि संस्था चालकाने या संदर्भात अधिक दक्ष राहून अशा प्रकारच्या घटना होणार नाहीत. यासंदर्भात नियोजन करावे . विशेषत: सैनिकी शाळा, महाविद्यालये आणि महानगरातील अतिउच्च दर्जाच्या शाळा - महाविद्यालयाने या संदर्भात विशेष लक्ष देणे गरजे आहे.

संदर्भ :-

१) http://rfd.maharashtra.gov
२) http://mr.vikaspedia.in
३) आपत्ती व्यवस्थापन - डॉ.वि.वि. घाणेकर
४) निसर्गबंध - प्रा.डॉ. दयानंद उजळंबे
५) निसर्ग वेध : प्रा.डॉ.दयानंद उजळंबे
६) मदत आणि पुनर्वसन मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) तुम चुप क्यों रहे केदार, (आलेख प्रकाशन, दिल्ली) हृदयेश जोशी .
८) आपदा प्रबंधन संभावनाएं और चुनौतियां (ओमेगा पहलीकेशन दिल्ली .प्रो. मधुसूदन त्रिपाठी , विनायक त्रिपाठी
९) विविध वर्तमानपत्रातील लेख .
१०) आपत्ती व्यवस्थापन केंद्र मार्फत पुरविलेले माहितीपत्रके .